# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/ ८०६५ दिनांक :२५.१०.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - विद्यापीठानी मंजूर केलेल्या शुल्काची माहिती विद्यापीठे /अभिमत विद्यापीठे / महाविद्यालये यांच्या संकेतस्थळावर तसेच नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेवावत.**

संदर्भ : - शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य/ शुल्क प्रसिध्दी दि २४.०९.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन एकत्रितपणे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदहू महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांकडून दरवर्षी अभ्यासक्रमनिहाय शुल्क निश्चित करण्यात येते. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या शुल्काची अंमलबजावणी अधिनस्त महाविद्यालयाकडून करण्यात येते. तसेच विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती तसेच विनाअनुदानित विधी अभ्यासक्रमाचे शुल्क हे मंजूरीसाठी शुल्क नियामक प्राधिकरण शुल्क निर्धारित करतात.

राज्यातील विद्यार्थ्यांना सर्व अकृषि विद्यापीटांकडून दरवर्षी मंजूर करण्यात आलेल्या शुल्काबाबतची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठे / अधिनस्त महाविद्यालयांनी दरवर्षी विद्यापीठांकडून मंजूर करण्यात आलेले शुल्क सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे तसेच सूचना फलकावर कळविणे आवश्यक आहे. परंतु काही विद्यापीठे व महाविद्यालयांनी शुल्क मंजूरीबाबतची माहिती संकेतस्थळ / नोटिस बोर्डवर प्रसिध्द केलेली दिसून येत नाही.

तरी सर्व अकृषि विद्यापीठ तसेच सर्व महाविद्यालयांनी कृपया विद्यापीठांनी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती आणि शुल्क नियामक प्राधिकरण विभागामार्फत निर्धारित केलेल्या शुल्कांची माहिती संकेतस्थळावर आणि नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे अनिवार्य आहे. सदर सर्व महाविद्यालय / विद्यापीठ आणि संस्था यांनी कार्यवाही करुन याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

आपला विश्वासू

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे